## स्पे.दि.मु.नं. ३२/२००७ मधील निशाणी क्र. १३९ वरील आदेश

वादींनी प्रस्तुत अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती होऊन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत वादींच्या कथनानुसार मुळ वादी विक्रमसिंह हे दि. १२/१२/२०१८ रोजी मयत झाले या वादींना वारस म्हणून प्रकरणी सामील केलेले आहे. वादी यांचे कुटुंबाचा चरितार्थ दावा मिळकतीवर अवलंबून आहे व ते सदर मिळकत वहिवाटीत आहेत. मयत मनोरमा यांचा विवाह यशवंतराव यांचेशी झाला होता व त्या संबंधामधून वादी विक्रमसिंह व प्रतिवादीक क्र. ४ ते ७ यांचा जन्म झाला. यशवंतराव हे एस.टी. खात्यामध्ये नोकरी करत असल्यामुळे त्यांचेकडे उत्पन्नाचे साधन नव्हते. लहान मुले असल्यामुळे मनोरमा यांची आई रुखुबाई यांनी दावा मिळकत मनोरमा यांना सन १९५३ मध्ये विना मोबदला बेचैनपत्राने दिली आहे. सदर बाबींचा खुलासा दाव्यामध्ये होणे आवश्यक आहे. सबब वादी यांनी दाव्यामध्ये त्या अनुषंगाने परिच्छेद ५अ वाढवून मिळण्याकरीता सदर अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांनी म्हणणे देऊन या अर्जास तीव्र विरोध दर्शविलेला आहे. त्यांचे कथनानुसार दावा मिळकत एकत्रित कुटुंबाशी संबंधित कधीही नव्हती. वादी यांनी मूळ दाव्यात मिळकत वडिलार्जित असल्याचे नमूद केले आहे. त्यास प्रस्तावित दुरुस्तीद्वारे बाधा आणण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तावित

दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे. वादी दावा प्रलंबित ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. सबब सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्र. ७ यांनी सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. मूळ वादी विक्रमसिंह यांनी प्रस्तुत दावा दि. ३०/०८/२००७ रोजी मनोरमाबाई यांना फसवून केलेले खरेदीपत्र रद्दबातल आहे असे हक्कज्ञापन होऊन मिळण्याकरीता तसेच निरंतर मनाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी याकामी कैफियत दाखल केलेली असून माझे मा. पुर्वाधिकारी यांनी दि. २७/०३/२०१५ रोजी नि.क्र. ७३ नुसार मुद्दे स्थापित केलेले आहेत. तद्नंतर प्रकरण पुराव्याकरीता प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १अ विरुध्द झालेला आदेश रद्द करण्यात आला व त्यास पुन्हा समन्स पाठविण्यात आलेले होते. याकामी रोजनाम्याचे अवलोकन केल्यास प्रतिवादी क्र. १अ यास समन्स बजावणीकरीता व त्याचे संदर्भात पूर्ण पत्ता मिळविण्याकरीता वादीने बराच कालावधी दिलेला दिसून येतो. तद्नंतर प्रतिवादी क्र. १अ याकामी हजर झालेले असून प्रकरण पुन्हा पुराव्यास ठेवण्यात आलेले होते.

६. दरम्यान वादी दि. १२/१२/२०१८ रोजी मयत झाला व प्रस्तत

वारसदार यांना या प्रकरणी वादी म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. प्रकरण वादीच्या पुराव्याकरीता प्रलंबित असताना प्रस्तुत अर्ज नव्याने समाविष्ट झालेल्या वादींनी दाखल केलेला आहे. वादीतर्फे विधीज्ञ यांनी सदर नवीन बाबी वारसांना दरम्यानच्या काळात माहिती झालेली असून त्या बाबी या प्रकरणी दाव्यामध्ये समाविष्ट होणे आवश्यक असल्याचे नमूद केले. प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ तर्फे या बाबीस विरोध दर्शविण्यात आलेला असून मूळ वादींनी यापुर्वी जी कथने केली आहेत त्यास छेद देणारी कथने प्रस्तावित दुरुस्तीद्वारे समाविष्ट होत असल्याचे नमूद केले आहे.

७. सदर प्रकरण हे २००७ पासून प्रलंबित आहे. याकामी मूळ वादीने प्रतिवादी यांना योग्य ती बजावणी करण्यामध्ये बराच बहुमूल्य वेळ घालविलेला आहे. प्रकरण पुराव्यास आल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल झालेला आहे. या प्रकरणी वादी यांनी अद्याप त्यांचा पुरावा सुरु केलेला नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार प्रकरणात मुद्दे स्थापित झाले असले तरी चौकशीस अद्याप प्रारंभ झालेला नाही. प्रस्तावित दुरुस्ती द्वारे वादी दावा मिळकत कशी प्राप्त झाली याबाबत उहापोह करु इच्छितात. प्रतिवादी हे सदर प्रस्तावित दुरुस्ती दाव्यातील कथनांना अनुसरुन नसल्याचे नमूद करतात.

८. वास्तविक पाहता दुरुस्ती अर्जास विचार करीत असताना प्रस्तावित

दुरुस्तीचे गुणदोष या न्यायालयास पाहता येणार नाहीत. प्रस्तावित दुरुस्ती मूळ कथनांना छेद देणारी असल्यास वादी यांनाच त्याचे स्पष्टीकरण अंतिमतः द्यावे लागणार आहे. वादी हे या अर्जाद्वारे मूळ दाव्यातील कथने कमी करुन मागत नसून केवळ एक परिच्छेद ५अ वाढवून मागत आहेत. तसा परिच्छेद दाव्यामध्ये समाविष्ट झाल्यास प्रतिवादी यांना देखील त्यास कैफियत देणेची तसेच पुरावा देण्याची संधी प्राप्त होणार आहे. या प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे अपरिमित नुकसान होईल असे दिसून येत नाही. किंबहुना प्रस्तावित दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेले सर्व वाद निराकारण करण्यास उपयुक्त ठरणार आहेत.

९. वादींनी याकामी नि.क्र. १४४ सोबत काही कागदपत्रे देखील दाखल केलेली आहेत. सदर कागदपत्रे ही ७/१२ उतारे व महसूल कागदपत्रे आहेत. ती कागदपत्रे यापुर्वी मूळ वादी यास मिळून सदर दुरुस्ती का मागता आली नाही याचे विवेचन अर्जामध्ये दिसून येत नाही. तरी परंतु विलंब या एकमेव कारणास्तव दुरुस्ती नामंजूर करता येणार नाही. या विलंबाकरीता वादी यांनी काही खर्च प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांना दिल्यास ते योग्य ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांना पुढील तारखेपर्यंत खर्च र. रु. ८००/- देण्याचा आदेश करण्यात येतो.

३. सदर खर्च रक्कम दिल्यानंतर वादी यांनी अर्जामध्ये नमूद केल्यानुसार दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

४. वादी यांनी त्वरीत दुरुस्त प्रती दाखल करावयाच्या असून सदर जुन्या प्रकरणामध्ये विना विलंब पुढील कार्यवाही पूर्ण करावयाची आहे.

Abhijit Rajshekhar Solapure

Digitally signed by Abhijit Rajshekhar Solapure
DN: cn=Abhijit Rajshekhar Solapure, ou=Judiciary, o=Bombay High Court, st=Maharashtra, c=IN

इस्लामपूर
दिनांक–२७/०८/२०१९

(अभिजीत रा. सोलापुरे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इस्लामपूर

- : C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

Name of Stenographer :- Sou. A.S.Patil

Court Name :- Shri. A.R.Solapure,
Civil Judge Sr. Dn., Islampur

Date of decision :- 27/08/2019

Order signed by PO. on :- 28/08/2019

Order uploaded on :- 28/08/2019